दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २६४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.२४ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# दुबईतील मिरॅकल गार्डनच्या धर्तीवर न्हावेखाडी येथे फुलली रामबाग

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची जनतेसाठी रामबागची मिरॅकल भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**दुबईच्या वाळवंटात मिरॅकल गार्डन फुलले त्याचप्रमाणे न्हावे खाडी येथील चिखलमय जमिनीवर भव्य दिव्य आणि महाराष्ट्राच्या सौंदर्यात भर पडणारी 'रामबाग' फुलली आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली हि अद्भुत संकल्पना प्रत्यक्षात साकारली आहे. त्यानिमित्ताने 'स्वर्गसुख आनंद देणारी रामबाग' महाराष्ट्राच्या नावलौकिक वाढवणारे असे उद्यान आता पनवेल तालुक्यात साकारले आहे.**



१४ एकर जागेतील या 'रामबाग' उद्यानात प्रथम भव्य आणि सुरेख प्रवेशद्वाराने होणारे स्वागत अत्यंत प्रफुल्लित करते. निसर्गरम्य हिरवळीसह विविध प्रकारच्या फुलझाडांच्या असंख्य विविध रचना येथे पहायला मिळतात, तलाव, विद्युत रोषणाई, पदपथ, चिरेबंदी बांधकाम, आसन व्यवस्था, पाळणे, डबल हर्ट आणि स्टोन असे दोन सेल्फी पॉईंट, मचवा, पाण्याचे कारंजे, अशा सर्व बाबी आकर्षक आणि मनमोहक या ठिकाणी आहेत. सायकांळी या उद्यानाचे रूप बदलते, त्यावेळी असणारी विद्युत रोषणाई अक्षरशः डोळ्याचे पारणे फिटणारी आहे. या सोबतीनेच वाहनांसाठी सुसज्ञ पार्किंग, सुरक्षा, प्रसाधनगृह अशी दर्जेदार सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानंतर या उद्यानातून बाहेर पडताना आपण या 'रामबाग'ला दिलेल्या भेटीबद्दल आभार मानणारे शब्दही मनाला आनंद देणारे आणि पुन्हा या रामबागेत येण्याची ओढ लावून जाते. विशेषतः या ठिकाणी लहानग्यांपासून वृद्धांचा विचार आवर्जून करण्यात आला आहे.

श्री म्हसेश्वर मंदिर परिसरात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली साकारण्यात आलेल्या 'रामबाग' या उद्यानाचा लोकार्पण सोहळा लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचे नातू अमोघ प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते (गुरुवारी, दि. २२) सायंकाळी पार पडला. या सोहळ्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी अर्चना परेश ठाकूर, भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, ओबीसी नेते जे. डी. तांडेल,रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. गणेश ठाकूर, ज्येष्ठ नेते कान्हाशेठ ठाकूर, कृष्णाशेठ ठाकूर, भरतशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर, माजी उपमहापौर सीता पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, ज्येष्ठ पत्रकार दा. चा. कडू गुरुजी, माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, हरेश केणी, एकनाथ गायकवाड, बबन मुकादम, समीर ठाकूर, कामोठे भाजपचे अध्यक्ष रविंद्र जोशी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, कल्पना ठाकूर, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा रत्नप्रभा घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच हरेश्वर म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, गव्हाण उपसरपंच विजय घरत, म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी. एल. ठाकूर, सागर ठाकूर, स्वप्निल ठाकूर, प्रतिक ठाकूर, प्रल्हाद पाटील, ठाकूर कुटुंबिय आणि हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

**पनवेल, उरणच नव्हे तर नवी मुंबईतील लोकं या ठिकाणी भेट देत आहेत. न्हावा शिवडी सीलिंक झाल्यावर मुंबई आणि राज्यातील लोकं हे उद्यान पहायला येतील याची मला खात्री आहे. दुबई, कॅनडा अशा अनेक देशातील उद्याने आम्ही पाहिली. मात्र दुबईतील मिरॅकल गार्डन पाहिले आणि असेच मिरॅकल घडणारे उद्यान उभारण्याचा संकल्प केला होता. दुबईतील गार्डन वाळवंटात उभारले गेले आहे आणि न्हावेखाडी पट्टा चिखल व पाण्याखाली आहे, त्यामुळे जसे दुबईत मिरॅकल घडले त्याचपद्धतीने आपल्या या ठिकाणीही चिखल व पाण्याखाली गेलेल्या पडीक जागेत मिरॅकल घडले पाहिजे, या उद्देशाने त्या धर्तीवर 'रामबाग' उभारले आहे असे सांगतानाच सर्वांचे आभार मानून आपल्या विभागाकरिता हे उद्यान उल्लेखनीय होईल आणि या उद्यानाचा उपयोग लोकांना होईल, याचे मला समाधान आहे.**

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले कि, मी लहान असताना येथील खाडीचा बंधारा फुटला होता. आणि त्यामुळे न्हावाखाडी, गव्हाण, कोपर येथील १२०० एकर पूर्ण जमीन समुद्राच्या पाण्याखाली गेली. त्यावेळी सरकारचे खारलँड नावाचे बोर्ड होते आणि बंधाऱ्यांच्या दुरुस्तीचे काम झाले पण तत्कालीन सरकारने त्याकडे गांभीर्यांने लक्ष दिले नाही, त्यामुळे हि सर्व जमिन चिखलाची झाली. या ठिकाणी असलेल्या म्हसेश्वर मंदिरात जातानाही चिखलातून वाट काढावी लागत होती आणि त्याबद्दल मनाला खंत असायची. आपण या ठिकाणी जन्मलो, वाढलो, प्राथमिक शिक्षण घेतले, खासदार झालो, त्या गावाच्या लौकिकासाठी काही तरी वेगळे केले पाहिजे हा उद्देश मी मनाशी बांधला होता. देवळात जाताना चिखलातून जावे लागत होते आणि आताची लहान मुलांची पिढी आहे त्यांना खेळायला, फिरायला जागा नाही, २०० मीटर च्या पुढे फिरता येत नाही, त्यामुळे आयुष्यात काही तरी केले पाहिजे कि त्यातून गावाला अधिक नावलौकिक मिळेल. म्हणूनच गेल्या पाच सहा वर्षांपासून रामबागचे स्वप्न डोक्यात होते. माझ्या गावाकरिता मी काही करू शकलो तर माझ्या जीवनाचा सार्थक होईल आणि ते या उद्देशाने झाले आहे. म्हसेश्वर देऊळ आणि रामबाग तयार झाले याचा मला अत्यंत आनंद झाला आहे. या सोहळ्यास उद्योजक जे. एम. म्हात्रे, भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, साई संस्थान वहाळ अध्यक्ष रवीशेठ पाटील यांनीही सदिच्छा भेट देऊन या समाजोपयोगी व उल्लेखनीय कार्याला शुभेच्छा दिल्या.

## द्रोणागिरी नोड परिसरातील गवताला आग

**दै.रायगड नगरी । उरण**

द्रोणागिरी नोड परिसरातील गवताळा आगी लावण्याच्या घटनांत वाढ झाली आहे. त्यामुळे सिडको कडून लाखो रुपये खर्चून लागवड करण्यात आलेली झाडे ही आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. तरी सिडकोने या घटनेचे गांभीर्य ओळखून संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.



उरण द्रोणागिरी नोड परिसराचा विकास सिडकोच्या माध्यमातून करण्यात येत आहे.त्यामुळे या परिसराचा कायापालट आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी या ठिकाणा वरील गवताची छाटणी, विविध प्रकारच्या झाडांचे संवर्धन, जतन करण्यासाठी सिडको कडून लाखो रुपये खर्च करण्यात येत आहेत. परंतु गवत छाटणीचा ठेका घेणारे ठेकेदार हे सिडकोच्या अधिकारी वर्गाच्या डोळ्यात दरवर्षी धुळ फेक करत सिडकोच्या भूखंडावरील गवताची छाटणी न करता त्या गवताला आग लावण्याचे काम करत आहेत. त्यामुळे या परिसरातील झाडे भक्ष्यस्थानी पडून प्रदुषणात वाढ होत आहे.

तरी सिडकोच्या द्रोणागिरी नोड परिसरातील भूखंडा वरील गवताची छाटणी न करता संबंधित ठेकेदार हे आगी लावून सिडकोचे लाखो रुपये हडप करण्याचा प्रयत्न करत असतील तर सिडको अधिकारी वर्गानी वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांची चौकशी करावी तसेच गवत छाटणी संदर्भात खर्च करण्यात येत असलेली रक्कम संबंधित ठेकेदारा कडून वसूल करावी अशी मागणी मनसेचे उरण तालुकाध्यक्ष सत्यवान भगत यांनी सिडको कडे केली आहे.

## १०२ दिव्यांगांना मिळाले जयपूर फूटचा आधार

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल आणि साधू वासवानी मिशन पुणे यांचा कौतुकास्पद उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनसेवेचा वसा असाच कायम सुरूच ठेवणार असून सामान्य परिवाराला सन्मानाने जीवन जगता आल पाहिजे या भावनेतून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ काम करत असल्याचे प्रतिपादन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुक्रवारी येथे केले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ पनवेल आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग व्यक्तींना जयपूर फूट बसविण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूट संदर्भात ऑक्टोबर महिन्यात शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात हात, पाय नसलेल्या दिव्यांग व्यक्तींची तपासणी करून कृत्रिम हात, पायासाठी मापे घेण्यात आली होती. त्यानुसार पुढील प्रक्रिया होऊन कृत्रिम अवयव तयार झाले. ते कृत्रिम अवयव आज या उपक्रमात १०२ व्यक्तींना बसविण्यात आले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिव्यांग व्यक्तींची आवर्जून चौकशी करून त्यांच्याशी संवाद साधला.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या उपक्रमास मंडळाचे उपाध्यक्ष व भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, डॉ. संतोष आगलावे, डॉ. सचिन जाधव, साधू वासवानी मिशनचे मार्केटिंग हेड डॉ. मिलींद जाधव, डॉ. सलील जैन, डॉ. सुशील ढगे, चिंध्रण ग्रामपंचायतीचे सरपंच एकनाथ पाटील, शिवाजी दुर्गे, संजय जाधव, ज्ञानेश्वर पाटील, मंडळाचे कार्यालयीन व्यवस्थापक अनिल कोळी आदी उपस्थित होते.

## भंगार पाडा परिसरातील जमीन संपादित करताना तेथील घरे तोडून न देण्याचा शिवसेनेचा निर्धार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील भंगार पाडा येथील काही जमिनी शासन मार्फत संपादित केली जाणार आहेत. परंतु तेथील राहती घरे तोडू न देण्याचा निर्धार शिवसेनेने केला आहे.

या संदर्भात भंगार पाडा येथील ग्रामस्थांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हा संपर्क प्रमुख बबनदादा पाटील यांची आज भेट घेतली. शासन मार्फत गावा नजीक सर्वे नंबर १३३/२,१३४/१,/२,१३४/३,१३४४अ,१३४/४क,१३४/४ब० हे सर्वे असलेली जमीन संपादीत करणार आहेत. त्यावेळी राहती घरे तोडली जाणार आहेत तरी सदर घरे वाचवण्यात यावी अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हा संपर्क प्रमुख बबनदादा पाटील यांच्याकडे केली असता मेट्रो सेंटरचे उपजिल्हाधिकारी दत्तात्रय नवले यांची बबनदादा पाटील व ग्रामस्थांनी भेट घेऊन बैठक घेतली व यावेळी ग्रामस्थांची भूमिका त्यांनी मांडली.

यावेळी दत्तात्रय नवले यांनी सुद्धा घरे न तोडण्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी शिवसेना महिला आघाडी तालुका संघटक मेघा सुनिल दमडे, सुनिल कृष्णा दमडे ,कैलास बामा गोसावी, पांडुरंग कटेकर,विलास दमडे, कृष्णा दमडे, संदिप दमडे,भावेश दमडे,अतीश दमडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### सिडकोच्या महागृहनिर्माण योजना दिवाळी - २०२२ करीता

## ऑनलाइन अर्ज नोंदणीस ०६ जानेवारी २०२३ पर्यंत मुदतवाढ

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**

सिडको महामंडळाच्या महागृहनिर्माण योजना दिवाळी – २०२२ या गृहनिर्माण योजनेस मिळत असलेल्या नागरिकांच्या उदंड प्रतिसादामुळे आणि नागरिकांना केलेल्या मागणीमुळे सदर योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यास ०६ जानेवारी २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. या योजनेकरिता अर्ज नोंदणी करण्यास २२ डिसेंबर २०२२ ही अंतिम तारीख होती. या योजने अंतर्गत नवी मुंबईच्या उलवे नोडमध्ये ७,८४९ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे महागृहनिर्माण योजना दिवाळी – २०२२ करीता ऑनलाइन अर्ज नोंदणी ०६ जानेवारी २०२३ पर्यंत करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज ०७ जानेवारी २०२३ पर्यंत सादर करता येणार आहेत. ऑनलाइन शुल्क भरण्याची अंतिम तारीख ०९ जानेवारी २०२३ आहे. स्वीकृत अर्जदारांची प्रारुप यादी १२ जानेवारी २०२३ रोजी तर स्वीकृत अर्जदारांची अंतिम यादी १६ जानेवारी २०२३ रोजी सिडकोच्या https://lottery.cidcoindia.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकानुसार योजनेची संगणकीय सोडत ०३ फेब्रुवारी २०२३ रोजी असल्याचे नमूद करण्यात आले होते, त्या ऐवजी १९ जानेवारी २०२३ रोजी पार पडणार आहे, असे वाचण्यात यावे.

## सिमेंटच्या गोण्या वाहून नेणारा ट्रक उलटला ; चालक जागीच ठार



**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई–पुणे एक्स्प्रेस वे आणि अपघात जणू समानार्थी शब्द झाले आहेत. आर्थिक राजधानी मुंबई व सांस्कृतिक राजधानी पुणे यांना जोडणारा मुंबई–पुणे एक्स्प्रेस वे सध्या मृत्यूचा सापळा ठरत आहे. या मार्गांवर अंदाज येत नसल्याने वाहन चालकांचे नियंत्रण सुटते आणि अपघात घडतो. अपघात नियंत्रणासाठी परिवहन विभाग व आयआरबी पेट्रोलिंग टीम विविध उपाय राबवित आहे, पण हे उपाय पुरेसे ठरत नसल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे या मार्गांवर दररोज अपघात होतच आहेत. आज शुक्रवार, दि. २३ डिसेंबर २०२२ रोजी खोपोली एक्झिटजवळ अपघात झाला.

पुण्याहून मुंबईकडे सिमेंटच्या गोण्या वाहून नेणारा ट्रक (क्र. MH 12 DQ 9526) वरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने तो भरकटला. या ट्रकने पाठीमागून समोरील ट्रकला जोरदार धडक दिली आणि तो रस्त्यांवर उलटला. या अपघातात ट्रक चालक जागीच ठार झाला आहे. ट्रकमधील गोण्या रस्त्यांवर पडल्याने मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान ही झाले आहे.

अपघाताची माहिती मिळताच आयआरबी पेट्रोलिंग टीम, देवदूत यंत्रणा, लोकमान्य म्बुलन्स सेवा, बोरघाट वाहतूक पोलीस, डेल्टा फोर्सचे जवान मदतीसाठी आल्याने मदतकार्य वेळेत पार पडले. बाधित वाहने लागलीच बाजूला काढल्यामुळे वाहतूकही खुली झाली. हा अपघात खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत झाला आहे.

# बनावटांची बजबजपुरी

मानवी शरीरात लोहाचे प्रमाण वाढविण्यासाठी विकल्या जाणाऱ्या काही प्रकारच्या गोळ्या आणि इंजेक्शन्स बनावट असल्याची तक्रार आल्यानंतर अन्न आणि औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईत अशी बनावट इंजेक्शने सर्रास विकली जात असल्याचे उघड झाले आहे. मुंबईत निदान पाच कंपन्यांनी अशी काही हजार इंजेक्शनांच्या कुप्या विकल्याचे आत्ता तरी तपासात लक्षात आले आहे. आता पुढील कारवाई होईल, तेव्हा होईल. मात्र, अशी बनावट इंजेक्शने सापडणे आणि त्यांच्यावर कारवाई होणे, हे भारतातील एकंदरीत बनावट औषधे आणि इंजेक्शनच्या व्यापाराची व्याप्ती पाहिली तर 'दर्या में खसखस' म्हणावे इतके अल्प आहे. काही वर्षांपूर्वी झालेल्या एका अभ्यासात भारतात विकल्या जाणाऱ्या एकूण औषधे आणि इंजेक्शनमधील वीस टक्क्यांहून अधिक ही एकतर कमी प्रतीची किंवा थेट बनावटच असल्याचे आढळले होते. भारत हा खरेतर जगाची 'फार्मसी' म्हणून ज्ञात आहे. करोना काळात भारताचा हा लौकिक अधिकच वाढला. दहा वर्षांपूर्वी भारतातून ९० हजार कोटी रुपयांची औषधे निर्यात होत. चालू आर्थिक वर्ष आता चार महिन्यांनी संपेल तेव्हा हा आकडा दोन-सव्वादोन लाख कोटींच्याही पुढे गेलेला असेल, असा अंदाज आहे. औषधांची इतकी प्रचंड निर्यात करणारा भारतासारखा देश आपल्याच भूमीत बनावट किंवा भेसळयुक्त औषधांच्या जागी अस्सल औषधे सर्व नागरिकांना पुरवू शकत नाही, ही खरोखर दुर्दैवी बाब आहे. काही दिवसांपूर्वीच केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडवीय यांनी हैदराबाद येथील एम्स रुग्णालयात बोलताना वैद्यकीय व्यवसाय नैतिकतेने होण्याची गरज प्रतिपादन केली. त्याचप्रमाणे, देशातील प्रत्येक नागरिकांच्या आरोग्याची आणि आरोग्य प्रश्नांची डिजिटल कुंडली तयार करण्याचा सरकारचा महत्त्वाकांक्षी मनसुबाही बोलून दाखविला. भारतातील १३० कोटी नागरिकांची जर अशी डिजिटल आरोग्य कुंडली तयार झाली तर ते एक फार मोठे यश असेल आणि उपचारांमध्ये अचूकता, वेग आणि नेमकेपणाही येऊ शकेल. मात्र, हा संकल्प यशस्वी व्हावयाचा असेल तर केंद्र तसेच स्वतंत्र एफडीए असणाऱ्या सर्वच राज्यांनी बनावट औषधे, इंजेक्शने, टॉनिक्स यांचा सुळसुळाट ताबडतोब बंद करायला हवा. अवघ्या काही दिवसांपूर्वी सुई आणि सिरिंज यांची गरज नसणाऱ्या पण इंजेक्शन देता येणाऱ्या साधनाच्या उत्पादनासाठी करार झाला होता. जर्मन कंपनीशी हा करार झाला आणि पुण्यात या पेनासारख्या दिसणाऱ्या साधनांचे उत्पादन सुरू झाले तर दोन फायदे होणार आहेत. एकतर, इंजेक्शन घेताना होणारी वेदना पूर्णपणे संपेल आणि दुसरे म्हणजे, सध्या इंजेक्शन देताना वापरली जाणारी सुई व सिरिंज एकदाच वापरून फेकून द्यावी लागते. हा कचरा प्रचंड प्रमाणात वाढतो आहे. नवी, अत्याधुनिक 'सिरिंज' तीस हजारवेळा वापरता येऊ शकेल. एकीकडे, हे प्रगतीची झेप दाखविणारे आणि भारताला विकसित देशांच्या पंगतीत बसविणारे चित्र आहे. याचवेळी, दुसरीकडे, मुंबईचे पोलिस अनेकदा थेट दिल्लीपर्यंत धडक मारून बनावट इंजेक्शने पुरविणाऱ्या किंवा विकणाऱ्या गुंडांच्या मुसक्या आवळतात. या दोन विपरीत चित्रांमधील अंतर जोवर कमी होत नाही, तोवर भारतातील सर्वसामान्य नागरिकांची आरोग्य क्षेत्रातील फसवणूक किंवा लुबाडणूक संपणार नाही. ही फसवणूक केवळ आर्थिक नसते. बनावट औषधांमुळे आजार तर बरा होत नाहीच; पण इतर विकार होऊन प्रकृतीचे कायमचे नुकसान होऊ शकते. दिल्लीतील विशेष न्यायालयाने कर्करोगावरील बनावट औषधे विकणाऱ्या एका विक्रेत्याला नुकताच जामीन नाकारला. हा जामीन नाकारताना न्यायाधिशांनी मांडलेले निरीक्षण महत्त्वाचे आहे. 'बनावट औषधे बनविणे किंवा विकणे हे हत्याकांड किंवा दहशतवाद यांच्यापेक्षा कमी भयंकर नाही,' अशा शब्दांत न्या. शैलेंद्र मलीक यांनी आपला उद्वेग व्यक्त केला. मध्यंतरी बनावट औषधांच्या विरोधात हिमाचल प्रदेशाच्या उच्च न्यायालयाने स्वत:हूनच याचिका दाखल करून घेतली. १८६० मध्ये जी फौजदारी दंड संहिता झाली, तीत बनावट औषधे विकणाऱ्याला गुन्हा शाबीत झाल्यास सहा महिने कारावास आणि एक हजार रुपये दंड अशी शिक्षा आहे. अर्थात, इतरही कायदे आहेत. मात्र, या प्रकरणातला पहिला घाव हा अशा औषधांच्या कारखान्यांवर घालायला हवे. मुख्य म्हणजे हे काम केंद्र आणि राज्य सरकारांनी एकत्र येऊन केले पाहिजे. मुळात, अनेक औषध कंपन्या, अनेक रुग्णालये, काही डॉक्टर आणि काही औषधविक्रेते बऱ्याच क्लृप्त्या करून रुग्ण व त्याच्या नातलगांना लुटतच असतात. अनावश्यक उपचार व शस्त्रक्रिया लादल्या जातात. मात्र, कर्करुग्णांना बनावट औषधे चढ्या किमतीला विकण्यासारखा अधमपणा नसेल. मुळातच भारतीय ग्राहक हा आर. के. लक्ष्मण यांच्या 'कॉमन मॅन'सारखा चिरमौनी आहे. त्यात या ग्राहकाचा पेशंट बनला तर त्याच्या वेदना व लूटमारीला काही अंतच राहात नाही. त्याला बनावट औषधे व इंजेक्शनपासून वाचविण्याची जबाबदारी सरकारची आहे. ती दोन्ही सरकारांनी प्रामाणिकपणे पार पाडायला हवी.

# ट्रस्टची ध्येय धोरण समजुन घेणे ही काळाची गरज : अशोक दाते

## रायगड जिल्हा कार्यकारिणी संयुक्त सभा उत्साहात संपन्न



**दै.रायगड नगरी । तळा**

महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्ट यांची रायगड जिल्हा येथील स्थानिक शाखा संयुक्त सभा गुरुवार दिनांक २२.१२.२२ रोजी गोवेळे विभाग सहाय्यक समिती श्रीकृष्ण मंदिर सभागृह चींचवली वाडी गोरेगाव येथे पार पडली या सभेसाठी महारष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्टचे अध्यक्ष अशोक दाते, उपाध्यक्ष सहदेव काते, सरचिटणीस राजेंद्र महाडिक, खजिनदार गंगाराम महाडिक, सहचिटणीस प्रशांत केळसकर, विश्वस्त अजय बिरवटकर, अविनाश कांबळे, चंद्रकांत चीले, सुरेश तांबडे, उदय पाटील, प्रीती खताते, सुप्रिया पगार माजी अध्यक्ष लक्ष्मण कांबळे, माजी विश्वस्त सुरेश पागार सर्व शाखांचे अध्यक्ष समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते श्री कृष्ण प्रतीमेचे पुजन व दिप प्रज्वलन करण्यात आले तदनंतर प्रमुख पाहुणे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देउन सत्कार करण्यात आला.यावेळी मृत पावलेले सभासद ज्ञाती बांधव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली त्याचबरोबर नुकत्याच पार पडलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत थेट सरपंच आणि सदस्यपदी निवडून आलेल्या समाज बांधव आणि भगिनींचा अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला.सभेला संबोधीत करताना अध्यक्ष अशोक दाते म्हणाले की संयुक्त सभे निमित्त फीरत असताना समाज बंधवां सोबत संवाद साधत असताना वेगळाच आनंद मिळत आहे.ट्रस्टची ध्येय धोरण समजुन घेणे ही काळाची गरज आहे आजच्या या तांत्रिकी युगात शिक्षणाला महत्व असुन विद्यार्थ्यांसाठी ट्रस्टच्या वतीने मोफत वह्यांचे वाटप शिष्यवृत्ती देण्यात येते त्याचा लाभ घेण्यासाठी पालकांनी पुढाकार घ्यावा असे त्यांनी यावेळी सांगितले

धर्मादाय आयुक्तांकडे संपूर्ण ट्रस्टच्या लोखाजोखा सादर करायचा असल्यामुळे शाखा अध्यक्ष आणि कार्यकारणी यांनी हिशोब वेळेत द्यावा अशी विनंती त्यांनी केली. अहवाल सादर करण्यात ज्यांना अडचणी येत आहेत.त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी एक दिवसाच्या शिबिराचे आयोजन करण्यात येईल असे त्यांनी यावेळी सांगितले.करोना काळात स्थानिक वर्धापन दिन आपण घेऊ शकलो नाही परंतु आता वर्धापन दिन साजरा करण्यास कोणतीही अडचण नसल्याचे त्यांनी सांगितले.सामाजिक क्षेत्रात काम करत असताना अनेक अडचणी येत असतात परंतु या अडचणींना सामोरे जात ईच्छा शक्ती आणि आत्मविश्वासाच्या जोरावर समाजाची प्रगती करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी समाज बांधवांना केले.स्थानिक तळा शाखा अध्यक्ष खेळू वाजे यांनी ट्रस्टचे पदाधिकारी आणि वीश्वस्त चांगल्या प्रकारचे काम करत असून रायगड जिल्ह्यातील शाखा अध्यक्ष आणि सर्व कार्यकारणी त्यांचे मागे ठाम उभी आहे असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक सरचिटणीस दिलीप खेडेकर यांनी केले तर आभार राजेंद्र महाडिक यांनी मानुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रायगड जिल्हा स्थानिक शाखा अध्यक्ष यांनी चांगल्या प्रकारचे नियोजन केले होते.

# कासु ते इंदापूर मार्गाचे चौपदरीकरणाचे काम जानेवारी महिन्यात नव्याने सुरू करणार



**दै.रायगड नगरी । पेण**

रखडलेल्या मुंबई गोवा महामार्गाच्या कामासाठी रायगड प्रेस क्लबनेने आंदोलनाचा इशारा देताच नॅशनल हायवे विभागाने संयुक्त बैठक घेऊन त्यामध्ये कासु ते इंदापूर मार्गाचे चौपदरीकरणाचे काम जानेवारी महिन्यात नव्याने सुरू करणार असल्याचे आणि खड्डे भरणाऱ्या ठेकेदार एजन्सीवर कारवाई करण्याचे आश्वासित केल्याने रायगड जिल्हा प्रेस क्लबने वाकण येथिल नियोजित आंदोलन स्थगित केले. याबैठकीत महामार्गावर पडलेले खड्डे तातडीने भरण्यात यावेत, तसेच खड्डे भरण्यात कामचुकारपणा करणाऱ्या ठेकेदार तसेच देखरेख एजंसिंवर सक्त कारवाई करण्याची मागणी प्रेस क्लबच्या वतीने करण्यात आली.

मुंबई गोवा महामार्गाचे काम सुरु होऊन ११ वर्षे रखडले आहे, या महामार्गाची दुरवस्था झाली आहे. पनवेल ते इंदापूर दरम्यान महामार्गावर भले मोठे खड्डे पडले आहेत. पेण ते कोलाड, तिसे हा रस्ताच उधवस्थ झालेला आहे. यारस्त्याचे खड्डे भरणारी एजन्सी सपशेल अपयशी ठरलेली असून कुठेही साधे खड्डे भरण्याचे दर्जात्मक काम एजन्सीला करता आलेले नाहीत, परिणामी या महामार्गावर पुन्हा मोठया प्रमाणावर अपघात होत आहेत. निष्पाप जिवांचे बळी जात आहेत, खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातात असंख्य प्रवासी गंभीररीत्या जखमी होत आहेत. आतापर्यंत राज्यकर्त्यांनी अनेकदा आश्वासने दिली परंतु महामार्गाची दुर्दशा कायम असून हा रस्ता मानवी वापरासाठी अयोग्य असल्याने रायगड जिल्हा प्रेस क्लबच्या वतीने बुधवार दि. ९ नोव्हेंबरला कोलाड ता. रोहा येथे मानवी साखळी आंदोलन केले होते. याप्रसंगी एनएचएआयचे अधिकारी यांनी उपस्थित राहून महिनाभरात रस्ता दुरुस्त करण्याचे सांगितले होते.

रस्त्यावरील साधे खड्डे भरून हा मार्ग सुस्थितीत करण्यास एनएचएआयला सपशेल अपयश आल्याने रायगड जिल्हा प्रेस क्लबने दि. २१ डिसेंबर रोजी वाकण नाका येथे अभिनव मार्गाने भजन आंदोलन करण्याचा इशारा मा. जिल्हाधिकारी रायगड आणि एनएचएआयला रितसर पत्र पाठवून दिला होता. याविषयी एनएचएआयचे प्रकल्प संचालक यशवंत घोटकर यांनी त्यांच्या पनवेल कार्यालयात गुरुवारी संयुक्त बैठक बोलावली, यावेळी रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, उपाध्यक्ष मोहन जाधव, मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, विभागीय सचिव अनिल भोळे, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख आदी उपस्थित होते. बैठकीत नॅशनल हायवे ने हा रस्ते सुस्थितीत करण्यासाठी विशेष बाब म्हणून १२ कोटीचा निधी मंजूर केला असून तातडीने रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात होणार असल्याचे तसेच खड्डे भरण्यात कामचुकारपणा करणाऱ्या ठेकेदार व देखरेख एजंसिंवर कारवाई करण्यात येईल असे घोटकर यांनी सांगितल्याने रायगड जिल्हा प्रेस क्लबने नियोजित आंदोलन तात्पुरती स्थगित केले असल्याचे जाहीर केले आहे.



व्हि.के.हायस्कूल मित्र परिवार

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**ज.व्य. विभाग,पनवेल**

[illegible]

[illegible] www.mahatenders.gov.in [illegible]

[illegible] www.mahatenders.gov.in [illegible]

दिनांक : [illegible]

[illegible]

क्र.आरओसी-२०२२-२३/क्र.५/सी४९४९

# नाताळच्या सुट्टी निमित्त श्रीवर्धन मधील हॉटेल्स व रिसॉर्ट हाऊसफुल्ल

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

यावर्षी नाताळचा सण रविवारी आल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील सर्व हॉटेल्स व रिसॉर्ट्स हाऊसफुल्ल झाल्याचे पाहायला मिळत आहे. आज महिन्यातील चौथा शनिवार असल्यामुळे सर्व शासकीय कार्यालयांना सुट्टी असते. त्यामुळे शनिवार रविवार लागून सुट्टी आल्यामुळे पर्यटकांनी या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे पाहायला मिळत आहे.

मोठ्या शहरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांना नाताळनिमित्त एक जानेवारीपर्यंत सुट्टी असल्याने अनेक पालक आपल्या मुलांना घेऊन फिरायला बाहेर पडत असतात. श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर, हरिहरेश्वर तसेच श्रीवर्धन शहर या ठिकाणी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणावरती बुकिंग केलेले आढळून येते. यावर्षी ३१ डिसेंबर रोजी देखील शनिवार येत असल्याने २४ डिसेंबर ते ३१ डिसेंबर संपूर्ण आठवडाभर पर्यटकांची गर्दी श्रीवर्धन तालुक्यात राहणार आहे.

पर्यटकांची गर्दी होत असल्यामुळे मासळीला देखील मोठ्या प्रमाणात मागणी आहे. त्यामुळे मासळीचा भाव देखील वाढलेला दिसून येत आहे. पापलेट, सुरमई, कोळंबी याच्या दरामध्ये प्रति किलो १०० ते १५० रुपयाची वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मिळकत मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड येथील आहे.

**मौजे : शिवकर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट नं. उपविभाग | भूधारणा पद्धत | हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ३६/१ | भोगवटदार क्र.१ | ०-१८-२०<br>०-१८-२० | ०.५६ |

वरील मिळकत ही श्रीमती.सविता तुकाराम बहिरा यांच्या मालकीची आहे. सदर मिळकत ही धिरज कुमार महेंद्र कुमार शुक्ला व श्री.निरजकुमार महेंद्रकुमार शुक्ला यांनी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. जर कोणाची हरकत, साठेकरार, विक्री करार, बोजा, गहाणखत असल्यास त्यांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

दि.२२/१२/२०२२

सही/-

**ॲड.धर्मनाथ नामा गोंधळी**

**हायकोर्ट मुंबई, बी.एससी एल.एल.बी.**

**निळकंठ हाईटस्, नं.-७०२,**

**सेक्टर-१६, कळंबोली, नवी मुंबई**

**मो.नं.९३२३४४१०८०**

# नववर्षाला रेल्वे प्रशासनाकडून पनवेलकरांना उद्वाहनाची भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्थानकातील प्रवाशांच्या सेवेत उद्वाहन बसवण्याचे काम प्रगतिपथावर आहे. साधारण २० प्रवाशांची क्षमता या उद्वाहनाची आहे. स्थानकात अनेक महिने रखडलेले स्थानिक प्रवासी उद्वाहनाबद्दल स्थानिक प्रवासी संघटना पाठपुरावा करत होती. अखेर त्याला यश मिळाल्याने नववर्षात ते प्रवाशांच्या सेवेत येणार आहे.

पनवेल रेल्वेस्थानकात मुंबई दिशेकडे पादचारी पुलाला उद्वाहन बसवले आहे; मात्र स्टक्चर तयार होऊन अनेक महिने लोटले, तरी पादचारी पुलाला लागून बांधलेले उद्वाहन प्रवाशांच्या सेवेत येत नव्हते. त्यामुळे प्रवाशांनी स्थानिक रेल्वे प्रशासनाला उद्वाहन तत्काळ सुरू करण्याची विनंती केली होती.

परंतु, पूर्वीच्या ठेकेदाराने अर्धवट काम सोडून गेल्याने उद्वाहन बसवण्यास विलंब लागला होता, अशी माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

सद्यस्थितीत उद्वाहनाचे काम पूर्णत्वास आले आहे. व नववर्षाला उद्वाहन सुरु होणार असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

## जाहीर सूचना

मी श्री.रमेश जवानमल जैन, वय : ६४ वर्षे, व्यवसाय : बिल्डर, प्रोप्रायटर महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन रा.४०३, निकी टॉवर सोसायटी बी विंग इस्त्राईल तलाव जवळ, पनवेल ४१०२०६ जाहीर सुचित करण्यात येते की,

पनवेल महानगरपालिका हद्दीतील शुभानशहा दर्गा ट्रस्ट, इस्त्राईल तलाव जवळ पनवेल, यांचे मालकीचा अंतिम भूखंड क्र.२१० क्षेत्र ३२६०.६० चौ.मी. विकसित करणेसाठी करार केलेला आहे. सदर भूखंड विकसन करणेबाबत श्री.इरफारन मेहबुबअली भोपाली रा.पनवेल यांना कुलमुखत्यारपत्र दिले होते. परंतु यांनी सदर विकसन करणे कामी काही काम केले नाही तरी इरफारन मेहबुबअली भोपाली रा.पनवेल यांना दि.३१/०७/२०१९ रोजी दिलेले कुलमुखत्यारपत्र दि.०२/१२/२०२२ रोजी आपसातील संमतीने रद्द केले आहे. भविष्यात सदर कुलमुखत्यार द्वारे दिलेले अधिकार वापरणेचे नाही.

श्री.रमेश जवानमल जैन, श्री.रामदास पाराजी शिंदे आणि श्री.अस्लम अब्दुल मजीद मुन्शी रा.पनवेल सदर विकसन करणार आहेत.

याद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री.इरफारन मेहबुबअली भोपाली रा.पनवेल यांचे सोबत पनवेल येथील अंतिम भूखंड क्र.२१० बाबत कोणताही व्यवहार करू नये. यापूर्वी त्यांचे सोबत काही व्यवहार झाले असल्यास तसेच भविष्यात कोणी व्यवहार केल्यास त्यास श्री.रमेश जवानमल जैन, प्रोप्रायटर महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत व आमचेवर बंधनकारक नाही. तसेच श्री.इरफारन मेहबुबअली भोपाली यांचे आर्थिक व्यवहाराशी श्री.रमेश जवानमल जैन, श्री.रामदास पाराजी शिंदे आणि श्री.अस्लम अब्दुल मजीद मुन्शी रा.पनवेल याचा काही संबंध नाही.

पनवेल

दि.२३/१२/२०२२

सही/-

**श्री.रमेश जवानमल जैन**

**मे.महालक्ष्मी कन्स्ट्रक्शन**

**श्री.रामदास पाराजी शिंदे**

**श्री.अस्लम अब्दुल मजीद मुन्शी**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी १) श्री.दिपक दामा डाकी, व २) श्रीमती.दमयंती दामा डाकी, दोघेही रा.मु.पो.विंधणे, ता.उरण, जि.रायगड यांचे सामाईक मालकीची मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत त्यांचेकडून आमचे अशिल श्री.अक्षय कुमार अशोक बोहरा यांनी कायमस्वरुपी खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | भूमापन/गट क्रमांक | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र हे.आर.पॉ. जिरायत | पोटखराबा हे.आर.पॉ. | एकूण हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४० | २ | ०-३९.०० | ०-००.०० | ०-१६.०० | ०.७७ |
| सदर संपूर्ण मिळकतीपैकी १) श्री.दिपक दामा डाकी, व २) श्रीमती.दमयंती दामा डाकी यांच्या मालकीची ० हे-१६ आर. ०० पॉ. (१६ गुंठे) ही मिळकत कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. | | | | | | |

त्याअर्थी सदर मिळकतीमध्ये अगर तिचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील सदर मिळकतीचे मालक १) श्री.दिपक दामा डाकी, व २) श्रीमती.दमयंती दामा डाकी यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल

दि.२३/१२/२०२२

सही/-

**श्री.विशाल अनंत मुंडकर**

**अडॅव्होकेट**

**शॉप नं.डी-४, किनारा को.ऑप.हौ.सोसा. लि., कोर्ट रोड, ५२ बंगला,**

**पनवेल ४१०२०६, जि.रायगड**

**मो.नं.९८७०७३९००३**

वकील वेदिका शिंदे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश क.स्तर

मा.श्री.ए.अर.गुन्नाल सो यांचे न्यायालयात

चौ.अर्ज नं.१८२५/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.२५/०१/२०२३

श्रीमती.छाया प्रकाश देशमुख — अर्जदार

विरुद्ध

कु.शितल प्रकाश देशमुख व इतर — सामनेवाला

वरील अर्जदार यांचे पती व सामनेवाले यांचे वडील श्री.प्रकाश रामराव देशमुख रा.ए.७०१, ईनटॉप हाईटस, प्लॉट नं.७०, ७१, सेक्टर-१९, एन.एच.पी. शाळेजवळ, ऐरोली, ठाणे, नवी मुंबई-४००७०८ हे दि.१०/१२/२०२१ रोजी रिलायन्स हॉस्पिटल येथे मयत झाले. सदर मयताच्या वारसाची नावे खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) श्रीमती.छाया प्रकाश देशमुख | पत्नी | अर्जदार |
| २) कु.शितल प्रकाश देशमुख | मुलगी | सामनेवाला |
| ३) श्रीमती.चंचल राहूल काळे | मुलगी | सामनेवाला |
| ४) श्रीमती.मिनल श्रीनिल कुडाळकर | मुलगी | सामनेवाला |

**जमिनीचे तपशिल ''अ''**

फ्लॅट नं.५०३, पाचवा मजला, ब्रिज भूमी हाईटस, प्लॉट नं.३५, सेक्टर-१७, उलवे, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड, क्षेत्रफळ ३४९ चौ.मी.

वरील मिळकतीबत उक्त अर्जदाराने मृत्यपत्राद्वारे वारसा हक्क दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांनी तसा लेखी हरकती जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापसून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारसा हक्क म्हणून दाखला प्रमाणपत्र देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

आज दि.२१ माहे १२/२०२२ रोजी माझ्या सहीने दिले.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्याया, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

दैनिक रायगड नगरी इफेक्ट

# एकदरा पुलाची दुरुस्ती करण्यासाठी ५०० लक्ष मंजूर

## आ जयंत पाटील यांच्या प्रश्नावर बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांची माहिती

**दै.रायगड नगरी । मुरड**

आगरदांडा व राजापूरीसह अनेक गावांना जोडणाऱ्या मुरुड तालुक्यातील एकदरा पुलाची दुरवस्था झाली असल्याबाबत वृत्त दैनिक रायगड नगरी मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर शेकापक्षाचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील यांनी विधान परिषदेत प्रश्न उपस्थित केला होता. सदर पुलाची दुरुस्ती अथवा नवीन पुल उभारण्याची मागणी जयंत पाटील यांनी केली होती. त्यावर उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी एकदरा पूलाच्या काही घटकांचे क्रॉक्रिट नादुरुस्त झाले आहे. तथापि, पूल वाहतूकीस सुरळीत आहे. त्यामुळे सदर पुलाच्या दुरुस्तीसाठी ५ कोटी रुपयांचे काम मंजूर करण्यात आले आहेत. सदर कामाला लवकरच सुरुवात होणार असल्याचेही रवींद्र चव्हाण यांनी सांगितले.

जयंत पाटील यांनी आपल्या प्रश्नात विचारले की, सुमारे ६५ वर्षांपूर्वी एकदरा पूल मुरूड-एकदरा खाडीवर बांधण्यात आलेला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गेल्या ३० वर्षांत सदर पुलाची दुरूस्ती करण्यात आली नाही. त्यामुळे सदर पूल


एकदरा पुलाचे प्लॅस्टर ढासळतेय

धोकादायक झाला असल्याचे त्यांनी निर्दर्शनास आणून दिले. सदर पुलाच्या बीमचे प्लास्टर निखळले असून अनेक ठिकाणी गंजलेल्या सळ्या दिसू लागल्या आहेत तर संरक्षक कठडेदेखील मोडकळीस आले आहेत, सदर पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून महाडच्या सावित्री पुलासारखी भयंकर दुर्घटना घडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

गेली ३० वर्षे पुलाची दुरुस्ती न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर पूलाच्या दुरूस्तीसाठी अथवा त्या ठिकाणी नवीन पूल बांधण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली आहे. याची विचारणा केली.

आ जयंत पाटील यांच्या प्रश्नावर उत्तर देताना बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण म्हणाले की, पूलाच्या काही घटकांचे क्रॉक्रिट नाद-ुरुस्त झाले आहे. तथापि, पूल वाहतूकीस सुरळीत आहे. सदर पुलाच्या दुरुस्तीची रक्कम रुपये ५ कोटींचे काम मंजूर करण्यात आले आहे. अंदाजपत्रक व निविदा विषयी कार्यवाही पूर्ण करुन दुरुस्तीचे काम लवकरच कार्यान्वित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## एकदरा पुलाची दुरुस्ती करण्यासाठी ५०० लक्ष मंजूर

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे गणित दिनाचे औचित्य साधून यशस्वीरित्या गणित जत्रेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय गणित दिन आणि निपूण भारत अभियानांतर्गत सदर गणित जत्रेचे आयोजन मुख्याध्यापक दिपक जगताप आणि सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांच्या उपस्थितीत सदर गणित जत्रेचे आयोजन करण्यात आले होते.या गणित जत्रोत्सवानिमित्त विद्यार्थी वर्गाने विविध भौमितिक रचना तसेच गणितीय संकल्पनेवर आधारित विविध आकार व प्रकारांच्या तसेच विविध रंगछटांनी आकर्षक अशा रांगोळ्या काढून तसेच विविध भौमितिक व गणितीय संकल्पनेवर आधारित विविध प्रकारच्या वस्तू बनवून या जत्रेची शोभा वाढविली.

# मनसे महिला पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पनवेल व उरण तालुका महिला आघाडी जिल्हाध्यक्षपदी असणाऱ्या अदिती सोनार यांच्यावर खांदेश्वर पोलीस ठाण्यात पनवेल तहसील कार्यालयातर्फे फसवणुकीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सोनार यांचा बांधकाम व्यवसाय असून नोव्हेंबर २०२० मध्ये विहीघर गावातील सर्व्हे क्रमांक १४५/२ येथील ७९ गुंठे क्षेत्रावर गृह प्रकल्पाचे बांधकाम करण्यासाठी घेतलेल्या बिनशेती परवानगीसाठी रायगड जिल्हाधिकाऱ्याच्या नावाचे बनावट आदेशपत्र तसेच बनावट शिक्क्यांचा वापर केल्याचे महसूल वापर विभागाच्या चौकशीत समोर आले आहे.

तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी केल्याचे समोर आल्याने संबंधित बांधकाम परवानगीने शासनाची फसवणूक झाल्याचा ठपका ठेवत हा गुन्हा शासनातर्फे मंडळ अधिकारी सुरेश मोराळे यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात नोंदविला आहे. अदिती सोनार यांनी वर्षभरापूर्वी मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्या उपस्थितीत मनसेमध्ये प्रवेश केला होता.

# ई रिक्षा सेवा कायमस्वरूपी सुरू रहावी ज्येष्ठ नागरिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार माथेरान नगरपालिकेने दि ५ डिसेंबर पासून ई रिक्षाच्या पायलट प्रोजेक्टला सुरवात केली आहे. ई-रिक्षा मुळे ज्येष्ठ नागरिकांची पायपीट वाचली आहे.दस्तुरी नाका टॅक्सी स्टँड गावापासून तीन किलोमीटर दूर असल्याने ज्येष्ठ नागरिकांची अक्षरशः दमछाक व्हायची परंतु सद्यस्थितीत ई-रिक्षाच्या महत्वपूर्ण सेवेमुळे दहा मिनिटात गावात यायला मिळते.याच मुख्य स्वस्त आणि सुरक्षित वाहतूक सेवेच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक वाहतुकीचा सुखद अनुभव घेत आहेत. भविष्यात ही सेवा अशीच कायमस्वरूपी सुरू रहावी यासाठी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष हरिभाई मेहता, उपाध्यक्ष अनंता शेलार , अशोक पवार,रमेश जोशी, शफिक भाई शेख यांनी प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांची नगरपरिषदेच्या कार्यालयात भेट घेऊन निवेदन दिले.

